राष्ट्रीय नाट्य विद्यालय

# फाळणी : एक शोकांतिका

लेखक: डॉ. प्रकाश झा

# फाळणी: एक शोकांतिका

## लेखक: डॉ. प्रकाश झा

**दृश्य:** एक कार्यक्रम चालू आहे...

**गाणे:** *आओ बच्चो तुम्हें दिखाएँ झाँकी हिंदुस्तान की...*

*इस मिट्टी से तिलक करो, यह धरती है बलिदान की...*

*वंदे मातरम... वंदे मातरम...*

*आओ बच्चो तुम्हें दिखाएँ झाँकी हिंदुस्तान की...*

*इस मिट्टी से तिलक करो, यह धरती है बलिदान की...*

*वंदे मातरम... वंदे मातरम...*

**मुलगा :** आजोबा...आजोबा तुम्ही ऐकलं, हे लोक किती छान गात आहेत ते!

**आजोबा :** *वंदे मातरम... वंदे मातरम...*शब्दच असे आहेत की असं वाटतं वारंवार गातच रहावं, वारंवार ऐकतच रहावं.

**मुलगा:** काय हो आजोबा, ही ‘फाळणीची शोकांतिका’ म्हणजे काय?

**आजोबा:** अरे वेड्या! तुला फाळणीचा अर्थ माहित नाही? जर फाळणीचा अर्थच माहित नसेल तर तुला शोकांतिकेचा अर्थ कसा समजणार?

मुलांनो... हा आपला देश आधी खूप मोठा होता. पण नंतर त्याची फाळणी झाली.

**मुलगा:** म्हणजे वाटणी ना?

**आजोबा:** हो, वाटणी झाली. पण वाटणी... आणि फाळणी यात फरक असतो...

म्हणजे असं, समजातुझ्याकडे दहा टॉफी आहेत. त्या तुला आपापसात वाटायच्या आहेत. कसे वाटणार? दोघं मिळूनपाच पाच अशा वाटून घेणार...आणि समजा तुझ्याकडे एकच टॉफी आहे... मग काय करणार?

**मुलगा:** मी तिचे तोडून दोन भाग करीन.

**आजोबा:** बाळा, तोडणं... तिचे तुकडे तुकडे करणं... हीच फाळणी असते. आणि यामुळे जे दुःख होतं... जो त्रास होतो ती म्हणजे शोकांतिका.

**मुलगा:** आजोबा, फाळणी म्हणजे काय, हे मला कळलं... पण ही शोकांतिका... फाळणी... शोकांतिका...

**आजोबा:** चल सांगतो.

**गाणे :** *आओ बच्चो तुम्हें दिखाएँ झाँकी हिंदुस्तान की...*

*इस मिट्टी से तिलक करो, यह धरती है बलिदान की...*

*वंदे मातरम... वंदे मातरम...*

*आओ बच्चो तुम्हें दिखाएँ झाँकी हिंदुस्तान की...*

*इस मिट्टी से तिलक करो, यह धरती है बलिदान की...*

*वंदे मातरम... वंदे मातरम...*

**मुलगा:** आजोबा... आम्हाला व्यवस्थित सांगा ना... ही फाळणी कशी झाली होती...?

**आजोबा:** सांगतो... सांगतो... फाळणीविषयी... आपल्या देशाच्या फाळणीविषयी सांगतो... लक्ष देऊन ऐका...फाळणीविषयी इतिहासकारांचे जे दृष्टीकोन आहेत, ते काळजीपूर्वक ऐका... लक्षपूर्वक ऐका आणि समजून घ्यायचा प्रयत्न करा...

**गाणे:** *है प्रीत जहाँ की रीत सदा*

*है प्रीत जहाँ की रीत सदा*

*मैं गीत वहाँ के गाता हूँ*

*भारत का रहने वाला हूँ*

*भारत की बात सुनाता हूँ।*

*है प्रीत जहाँ की रीत सदा*

**सूत्रधार 1:** अखंड भारताची फाळणी ही अभूतपूर्व मानवी स्थलांतर आणि असहाय्यतेमुळे कराव्या लागणाऱ्यापलायनाची करुण गाथा आहे.

**निवेदक 2:** यागाथेमध्ये लाखो लोक पूर्णपणे वेगळ्या वातावरणात अनोळखी लोकांमध्ये नवीन निवारा शोधत होते.

**सूत्रधार 1:** ही श्रद्धा आणि धर्म यावर आधारित हिंसक फाळणीची कथा आहे. त्याबरोबरच ती यागोष्टीचीही कथा आहे की...

**सूत्रधार 2:** एका जीवन शैलीचं आणि वर्षानुवर्षाच्या सहअस्तित्वाचे युग अचानक आणि नाट्यमयरित्या कशा प्रकारे संपलं.

**सूत्रधार 1:** सुमारे साठ लाख हिंदू, शीख आणि इतर संप्रदायांचे लोक ज्या भागातून निघून आले, तो भाग नंतर पश्चिम पाकिस्तान बनला.

**सूत्रधार 2:** पासष्ठ लाख मुस्लिमलोक पंजाब, दिल्ली इत्यादी भारतीय भागांतून पश्चिम पाकिस्तानात स्थलांतरित झाले.

**सूत्रधार 1:** वीस लाख हिंदू आणि इतर संप्रदायांचे लोक पूर्व बंगालमधून पश्चिम बंगालमध्ये आले. हाच पूर्व बंगाल नंतर पूर्व पाकिस्तान बनला.

**सूत्रधार 2:** 1950 मध्ये आणखी वीस लाख हिंदूआणि इतर संप्रदायांचे लोक पश्चिम बंगालमध्ये आले.

**सूत्रधार 1:** दहा लाख मुस्लिम पश्चिम बंगालमधून पूर्व पाकिस्तानात गेले.

**सूत्रधार 2:** या शोकांतिकेत मरण पावलेल्या लोकांची संख्या सुमारे पाच लाख सांगितली जाते.

**सूत्रधार 1:** पण हा आकडा पाच ते दहा लाखांच्या घरात असण्याचा अंदाज आहे.

**गाणे:** *आँखों से बहते, यह दर्द की धारें*
*आँखों से बहते, यह दर्द की धारें*
*छूटी हुई जिंदगी, खोईहुई यारें।*
*छूटी हुई जिंदगी, खोई हुई यारें।*
*आँखों से बहते, यह दर्द की धारें*
*आँखों से बहते, यह दर्द की धारें*
*छूटी हुई जिंदगी, खोई हुई यारें।*
*छूटी हुई जिंदगी, खोई हुई यारें।*

**मुलगा:** आजोबा... या लोकांचं घरदार सर्व काही हिसकावून घेतलं गेलं. मला तर हे ऐकूनच भीती वाटू लागली आहे.

**आजोबा:** भीतीदायक गोष्ट आहेच ही बाळा... पण जरा कल्पना कर, त्यावेळी जे लोक होते, त्यांच्यावर काय काय प्रसंग गुदरला असेल?

**मुलगा:** आजोबा... त्यावेळी माझ्यासारखी मुलंही असतील ना... त्यांचं काय झालं असेल?

**आजोबा:** होय... तुझ्यासारखी लाखो मुलं होती. त्यांनी स्वतःच्या डोळ्यांनी ते दृश्य पाहिलं होतं, आणि ते दृश्य आठवून आजही त्यांच्या अंगावर शहारे उभे राहतात...

**मुलगा:** आम्हालाआणखी काही सांगा ना आजोबा...

**आजोबा:** सांगतो, तर मुलांनो ऐका...

**गाणे:** *देखो ये बंगाल यहाँ का, हर चप्पा हरियाला है*

*यहाँ का बच्चा-बच्चा अपने देश पे मरने वाला है*

*आओ बच्चो तुम्हें दिखाएँ झाँकी हिंदुस्तान की...*

*इस मिट्टी से तिलक करो, यह धरती है बलिदान की...*

*वंदे मातरम... वंदे मातरम...*

*वंदे मातरम... वंदे मातरम...*

**मुले :** गुड मॉर्निंग सर...

**शिक्षक:** गुड मॉर्निंग...प्लीजसिट डाऊन...

**मुले :** सर... ऐका ना...तुम्ही फाळणीविषयी काहीतरी सांगत होता... तुम्ही म्हणाला होता की बरंच काही गमावलंय... आता पुढचं सांगा ना, फाळणीचं काय झालं...

**शिक्षक:** 20 फेब्रुवारी 1947 रोजी, ब्रिटिश पंतप्रधान क्लेमेंट अॅटली यांनी हाऊस ऑफ कॉमन्समध्ये घोषणा केली...

**मुलगा:** सर... पुढचं मी सांगू... मलासुद्धा माहित आहे...

**शिक्षक:** बरं... सांग...

**मुलगा 1:** तर मित्रांनो... सरकारने 30 जून 1948 च्या आधी...

**शिक्षक:** अरे पूनम... तिथून कुठं... इथं येऊन सांग ना सर्वांना...

**मुलगा 2:** बरं सर...

तर मित्रांनो... सरकारने 30 जून 1948 च्या आधी... सत्तेचे हस्तांतरण करून भारत सोडून जायचा निर्णय घेतला होता.

**मुलगा 3:** सर मी...

**शिक्षक:** हो, सांग...

**मुलगा 4:** तसंपाहतालॉर्ड माउंटबॅटन यांच्यामुळे ही संपूर्ण प्रक्रिया एक वर्ष आधीच पूर्ण केली गेली होती.

**मुलगा 5:** होय सर... लॉर्ड माउंटबॅटन हे 31 मे 1947 रोजी लंडनमधून सत्तेच्या हस्तांतरणाची मंजूरी घेऊन नवी दिल्लीला परतले होते.

**मुलगा 6:** मलाही आठवलं... 02 जून 1947 रोजी झालेल्या ऐतिहासिक बैठकीत फाळणीच्या योजनेवर ढोबळ मानाने सहमती झाली होती.

**मुलगा 7:** होय सर...भारताच्या फाळणी करण्याचा निर्णय एका अटीसारखा होता.भारतासारख्या देशाची फाळणी धार्मिक आधारावर व्हावी, या गोष्टीला मोठ्या प्रमाणात विरोध झाला.

**मुलगा 1 :** ज्यांना या फाळणीत स्वतःचे हित आणि उज्ज्वल भविष्य दिसत होते, केवळ तेच नेते या फाळणीसाठी मानसिकदृष्ट्या तयार होते, असे म्हणतात.

**शिक्षक:** अरे वा मुलांनो... तुम्हाला बरंच काही माहित आहे... आता पुढचा तास सुरू करण्यापूर्वी आपण एक छोटा-सा ब्रेक घेऊया...

**सर्व मुले :** ठीक आहे सर...

**गाणे:** *वंदे मातरम...वंदे मातरम...*

*वंदे मातरम...वंदे मातरम...*

*वंदे मातरम...वंदे मातरम...*

*वंदे मातरम...वंदे मातरम...*

**सूत्रधार 1 :** दादा, फाळणीविषयी तुझं काय मत आहे?

**सूत्रधार 2 :** भाऊ,फाळणीला प्रोत्साहन दिल्याने समाजात सुधारणा होईल. वेगवेगळ्या समुदायाच्या लोकांना आपापले अधिकार मिळतील.

**सूत्रधार 1 :** नाही, नाही. फाळणीमुळे असं काहीही होणार नाही. अरेएकतेमुळेच समाजाचा विकास होऊशकतो. आपण सर्वांना एक होऊन समृद्धीच्या मार्गाने पुढे गेलं पाहिजे.

**सूत्रधार 2 :** तुझं म्हणणं चांगलं आहे. पण फाळणीमुळेच शक्य होतं, ही वास्तविकता आहे.

**सूत्रधार 1 :** नाही, नाही... आपण सर्वांनी मिळून आपल्या देशाला प्रगतीच्या वाटेने पुढे घेऊन गेलं पाहिजे. आणि फाळणीची शोकांतिका नष्ट केली पाहिजे.

**सूत्रधार 2 :** तुला काय वाटतं... आपण सर्व मिळून हा संदेश आत्मसात करू शकू?

**सूत्रधार 1 :** का नाही... यासाठी आपणा सर्वांना एकजूट व्हावं लागेल. आणि ही एकात्मताच आपला वारसा आहे. तिचे जतन करावेच लागेल.

**सूत्रधार 2 :** ठीक आहे, पण अखंड भारताच्या फाळणीच्या वेळी काय झालं होतं, ते तर सांग...

**सूत्रधार 1 :** याविषयी तर तेच लोक सांगतील, ज्यांनी ते भोगलं आहे...

*वंदे मातरम...वंदे मातरम...*

*वंदे मातरम...वंदे मातरम...*

*वंदे मातरम...वंदे मातरम...*

*वंदे मातरम...वंदे मातर...*

**मुले:** गुड आफ्टरनून सर...

**शिक्षक 2 :** गुड आफ्टरनून... प्लीज सिट डाऊन... हाँ आता पुढचं बोलू... आता पुढचं ऐका... ऐका... 9 जून 1947 रोजी नवी दिल्लीतील इम्पीरियल हॉटेलमध्ये ऑल इंडिया मुस्लिम लीगची बैठक झाली.

**मुलगा 1 :** सर...सर... त्याच्या पुढचं मी सांगू...

**शिक्षक:** अरे पूनम, तुला तर सगळं काही माहित आहे... छान, तसंही ज्ञान हे दिल्याने आणखी वाढत असतं... सांग...सांग...

**मुलगा 1 :** मित्रांनो... तिथं फाळणीच्या मागणीचा प्रस्ताव जवळपास सर्वानुमते मंजूर झाला.

**मुलगा 2 :** त्यात फाळणीच्या बाजूने 300 आणि विरोधात फक्त 10 मते पडली.

**आजोबा:** 1946 आणि 1947 मध्ये भारताच्या वेगवेगळ्या भागांना हादरवून सोडणाऱ्या जातीय हिंसाचाराची व्याप्ती आणि क्रूरता याबद्दल अनेक पुस्तकांमध्ये तपशीलवार लिहिलं गेलं आहे.तो 4 मार्च 1947 चा दिवस होता. हिंदू आणि शीखांच्या मिरवणुकीवर पोलिसांनी गोळीबार केला.

**सूत्रधार 2 :** 06 मार्चच्या सकाळपर्यंत पहाता पहाता, अमृतसर, जालंधर, रावळपिंडी, मुलतान आणि सियालकोटसह पंजाबमधील सर्व शहरे दंगलीच्या आगीने घेरली गेली.

**सूत्रधार 1 :** पंजाबच्या तुलनेत बंगालमध्ये अनेक दशके सुरू असलेले स्थलांतर आणि पुनर्वसनाचे स्वरूप वेगळंच होते.

**सूत्रधार 2 :** बंगालचे लोक तर खूपच दुर्दैवी होते...

**सूत्रधार 1 :** का?

**सूत्रधार 2 :** कारण... बंगालच्या लोकांना एकदा नव्हे तर दोन-दोन वेळा स्थलांतर करावं लागलं होतं.

**सूत्रधार 1 :** दोन...दोन...वेळा...

**सूत्रधार 2 :** एकदा त्यांना आपली घरंदारं सोडून पूर्व पाकिस्तानात जावं लागलं.

**सूत्रधार 1 :** आणिपुन्हा त्यांना तिथून पळून पश्चिम बंगालमध्ये यावं लागलं...

**सूत्रधार 2 :** भाऊ... तिथल्या अधिकाऱ्यांना फाळणीमुळे उद्भवलेल्या संकटाची तीव्रता लक्षात आलीच नाही....

**सूत्रधार 1 :** हजारो हिंदू कुटुंबे ढाका आणि आसपासच्या भागातून पळून सियालदह येथे पोहोचली...

**सूत्रधार 2 :** इतक्या सहजासहजी पोहोचली नाही... वाटेत एकेका स्त्रीचे दागिने बळजबरीने हिसकावून घेतले गेले... त्यांचा विविध प्रकारे छळ केला गेला...

**सूत्रधार 1 :** मुली, स्त्रिया, वृद्ध यांना अमानुषपणे वागणूक दिली गेली...

**सूत्रधार 2 :** स्त्रिया असोत, मुले असोत, वा वृद्ध असोत... सर्वांशी गैरवर्तन केलं गेलं...

**सूत्रधार 1 :** होय, हे खरं आहे... फाळणीच्या वेळी स्त्रियांचं खूप जास्त नुकसान झालं.

**सूत्रधार 2 :** लाखो कुटुंबे नातेवाईकांपासून कायमची दुरावली.

**सूत्रधार 1:** एवढेच नव्हे, तर तिथे ट्रेनमध्ये लोक जिवंत चढले होते, आणि इथं येता येता ते मृतदेह झाले होते...

**(मुलगा रडू लागतो.)**

**आजोबा:** रडू नकोस बाळा... शांत हो...

**मुलगा:** आजोबा, ढाक्याहून आलेल्या त्या निर्वासितांचे काय झाले? त्यांचं सर्वकाही लुटलं गेलं होतं ना...

**आजोबा:** तीसुद्धा एक अजब कहाणी आहे बाळा... म्हणतात ना - न घर का ना घाट का...

**मुलगा:** असं का...?

**आजोबा:** ती लोकं आपापली घरंदारं सोडून इथं आली... आणि इथंही ती निर्वासित म्हणून गणली गेली...

*आँखों से बहते, यह दर्द की धारें*

*आँखों से बहते, यह दर्द की धारें*

*छूटी हुई जिंदगी, खोई हुई यारें।*

*छूटी हुई जिंदगी, खोई हुई यारें।*

**पात्र 3 :** पूर्व पाकिस्तानातून इतके लोक बंगालमध्ये आले की कोणाच्याही घरात एक इंचही जागा उरली नाही... आपल्या नातेवाईकांसाठी...

**पात्र 4 :** पश्चिम बंगाल सरकारने चगाव, नारायण गंज, बारीसाल आणि चांदपूर येथील निर्वासित कलकत्त्याला नेण्यासाठी पंधरा स्टीमरची व्यवस्था केली.

**पात्र 3:** पूर्व पाकिस्तानातील लोकांनी जलमार्गाने स्थलांतर केले होते... अनेक बोटी... पाण्यात बुडाल्या... काही दिवसांनी, पाण्यावर फक्त मृतदेहच तरंगत होते...

**पात्र 3+4:** असं काय खास होतं आमच्या हिश्श्याच्या जमिनीत... ज्याच्यासाठी आमचं सर्वकाही हिसकावून घेतलं गेलं...

**पात्र 3 :** बंगाल, पंजाब, गुजरात, सिंध, सगळीकडे फाळणीची आग पेटली.

**पात्र 4 :** सिंध प्रांतातील लोक निर्वासित होऊन येथे आले, पण... सिंध प्रांत आपल्याला नाही मिळाला...

**सूत्रधार 1 :** सिंध प्रांतामुळे आठवलं, बहुतेक सिंधी कुटुंबे राजस्थानात गेली.

**(एक सिंधी कुटुंब म्हणून)**

**सिंधी पुरुष:** फाळणीनंतर पाकिस्तानातून लाखो निर्वासित भारतात आले. आणि राजस्थान अशा राज्यांपैकी एक आहे जिथे मोठ्या प्रमाणात निर्वासित आले.

**सिंधी स्त्री:** राजस्थानमध्ये आमच्यासारख्या निर्वासितांसाठी मदत आणि पुनर्वसनाची व्यवस्था करणं हे फार मोठं आव्हान होतं.

**सिंधी पुरुष:** आमच्या येण्याने राजस्थानच्या सांस्कृतिक जडणघडणीतही बदल झाला. आम्ही वेगळे दिसू लागलो. आमची संस्कृती, भाषा, चालीरीती सगळंच बदललं.

**सिंधी स्त्री:** सिंधमध्ये माझा मोठा व्यवसाय होता. पण इथं माझ्या मुलांना दोन वेळची भाकरसुद्धा मिळत नव्हती.

**सिंधी पुरुष:** तिथं माझं सगळं दुकान, घरदार लुटून नेलं.

**सिंधी स्त्री:** ती रात्र मी कशी आठवू दादा... जेव्हा मी माझ्या मुलांना कडेवर घेऊन पळाले होते.

**सिंधी पुरुष:** जीव वाचवत पळतापळता कसाबसा राजस्थान बिकानेरला एका लांबच्या नातेवाईकाच्या घरी पोहोचलो.

**सिंधी स्त्री:** आमचे अनेक नातेवाईक वाटेत दुरावले आणि आजतागायत ते आम्हाला दिसले नाहीत. काही लोक झुंझुनूमध्ये राहिले.

**सिंधी स्त्री:** ते बिचारे तरी किती दिवस आम्हाला पोसणार? शेवटी वैतागून मला निर्वासित छावणीत यावंच लागलं. एखादं हसतंखेळतं कुटुंब, गाव, शहर कसं उध्वस्त होतं हे आम्हाला विचारा...

**(दोघेही किंचाळून रडू लागतात)**

**गाणे:** *आँखों से बहते, यह दर्द की धारें*

*आँखों से बहते, यह दर्द की धारें*

*छूटी हुई जिंदगीए खोई हुई यारें।*

*छूटी हुई जिंदगी, खोई हुई यारें।*

**मुलगा:** आजोबा... आता मला काही ऐकायचं नाही...

**सूत्रधार 1+2 :**जिथं आयुष्याची प्रत्येक सकाळ हसतमुखाने आल्हादित होत असे..

तिथलं दृश्य पाहून अश्रूंचंही रक्तात रूपांतर झालं...

**पात्र 3+4 :**नाही जास्त वेदना तुझ्या ओझ्याची माझ्या खांद्याला
जेव्हा तोलतो मी दहशत, युद्ध आणि क्रूरता...

**पात्र 1 :** फाळणीच्या शोकांतिकेत आपले प्राण गमावलेल्या आणि स्थलांतराच्या वेदना सहन करणाऱ्या लाखो भारतीयांना शतशः नमन...

**पात्र 2 :** आपल्या देशाच्या एकतेचे आणि अखंडतेचे रक्षण करण्यासाठी आपणा सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करावे लागतील.

**पात्र 3 :** फाळणीच्या राजकीय खेळात एका भावाविरुद्ध दुसऱ्या भावाच्या मनात विष कालवलं होतं.

**पात्र 4 :** या विषामुळे माणूसाने माणसाचा चावा घेतला, माणसाने माणसाला दूर केलं, माणसाने माणूस गमावला. आणि आपल्या अखंड भारताची फाळणी झाली.

**सर्व:** आपण त्यांना बळी पडायचं नाही...

**पात्र 1:** भारत देश अखंड ठेवायचा आहे.

**सर्व:** भारत देश अखंड ठेवायचा आहे.

**पात्र 4 :** आता कोणत्याही राजकीय भूलथापांना बळी पडायचं नाही.

**सर्व:** आता कोणत्याही राजकीय भूलथापांना बळी पडायचं नाही.

**पात्र 4:** अखंडता आणि एकाग्रतेच्या जोरावर आपण आपली भारत माता विकसित करू.

**सर्व:** आपण आपली भारत माता विकसित करू.

होय, चला...आपण सर्व प्रतिज्ञा करू...

भारत माता की जय... भारत माता की जय...
*वंदे मातरम...वंदे मातरम...*

*वंदे मातरम...वंदे मातरम...*

*वंदे मातरम...वंदे मातरम...*

*वंदे मातरम...वंदे मातरम...*

***